# या राजकारण्यांच्या मुलांना पहिल्यांदा फाट्यावर मारा!!

राजू परुळेकर
राजकीय सामाजिक विश्लेषक



**राजकारणातील आजची पिढी ही घराणेशाहीचं नेतृत्व करणारी! आधीच्या पिढीची पुण्याई तर म्हणताच येणार नाही, पण आधीच्या पिढीच्या पैशावर, पैशाच्या जोरावर राजकारण करणारी! राजकीय-सामाजिक विश्लेषक राजू परुळेकर यांच्या मते ही आजची पिढी हे फक्त मागच्या पिढीचं 'बायॉलॉजिकल एक्स्टेन्शन' आहे. राजकारणातील ही पिढी कशी आहे? त्यांच्यामुळे पुढच्या राजकारणाची दिशा-दशा कशी असणार? अशा असंख्य प्रश्नांवर खास आपल्या शैलीत उत्तरं देणाऱ्या परुळेकरांची मुलाखत आजच्या राजकारणावर आणि राजकारणातील आजच्या पिढीवर जळजळीत भाष्य करते.**

**प्र. – राजकारणातल्या आजच्या पिढीबद्दल काय मत आहे?**

– खरं तर राजकारणात आता जी काही नावे आहेत त्यांना आजची पिढी म्हणता येणार नाही. ते आधीच्या पिढीचे 'बायॉलॉजिकल एक्स्टेंशन' आहे. एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास नाही, वाचन अजिबात करत नाहीत. अगदी एखादा अपवाद वगळला तर ९९ टक्के सर्वजण असेच आहेत. अगोदरच्या पिढीच्या पैशावर, पैशाचा वापर करून राजकारणात मारून नेता येतं, असा यांचा समज आहे. जनतेशी थेट संपर्क नाही, अशा असंख्य गोष्टी सांगता येतील हो आणि याला उद्धव ठाकरे, प्रणती शिंदे, सुप्रिया सुळे, पूनम महाजन, रणजितसिंह मोहिते पाटील, पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, अमित देशमुख अशी अनेक नावे घेता येतील जी याला अपवाद नाहीत. या सर्वांना जे सामर्थ्य लाभलंय, नाव- सुबत्ता लाभलीय हीच त्यांची सगळ्यात मोठी कमजोरी आहे. नेते मातीतून जन्माला येत. त्यांच्याकडे पैसे नसत, त्यामुळे लोकांशी संपर्क साधणे त्यांच्यासाठी आवश्यक बनायचं

आपल्या देशात ६५ टक्के गरीब राहतात आणि फक्त ५ टक्के लोक 'पेज थ्री'वर येत असतात हे यांना माहीतच नसतं. जिरायती-बागायती शेती, सहकार चळवळ,

शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न, त्या शेतकऱ्यांचा कष्ट करून येणारा घाम आणि त्याचा वास या सगळ्याशी ते अपरिचित आहेत.

त्यांना परिचय आहे तो स्पा-हर्बल स्पा, फ्रूट मसाज, बॉडी मसाज, अंगभर फवारलेल्या परदेशी अत्तराचा वास, सिंगापूर-हाँगकाँगमधील बँक खाती, तिथे बांधलेली घरे, परदेशात सुट्या घालवणे अशी कदाचित ही राजकारणातली आताची पिढी आहे.

**प्र.- सगळी अशी परिस्थिती दिसत असताना राजकारणातील पुढील दिशा-दशा कशी असेल?**

- वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण हे मातीतील नेते होते. तळागाळातल्या लोकांशी थेट संपर्क होता. आता फक्त झेंडे नाचवणे आणि गुलाल उधळण्यापुरती पिढी राहिलीय. 'झेंडे-गुलालाचं' राजकारण करणारी ही आजची पिढी भारतीय संघराज्याचं विघटन करेल हे फक्त मीच नाही तर शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचंही मत आहे.

प्रत्येक राज्यात कोणत्या ना कोणत्या घराण्याची मक्तेदारी आहे. त्या घराण्यांभोवती तिथलं राजकारण फिरत आहे. जम्मू-काश्मीरमध्ये मुफ्ती महंमद सईद आणि फारूख अब्दुल्ला, मध्य प्रदेशमध्ये सिंदिया, झारखंड-मुंडा, महाराष्ट्र- पवार अशी अनेक नावं आपल्या समोर येतील. या अशा पद्धतीने होणाऱ्या राजकारणामुळे भारतीय संघराज्याच्या विघटनाचे दिवस फार दूर नाहीत. जम्मू-काश्मीर, ईशान्येकडील सात राज्ये, असे प्रत्येक जण स्वत:ला स्वतंत्र करण्यासाठी धडपडत आहे. असं आपण त्यांना काय देत आहोत, की त्यांनी स्वत:ला भारतीय म्हणून घेतलं पाहिजे किंवा त्यांना अभिमान वाटला पाहिजे.

मलेशियाच्या डॉ. महातीर यांनी नेहरूंना पत्र लिहिलं होतं, की 'आम्हाला (मलेशियाला) विकसनशील व्हायचं आहे, आम्हाला मदत करा' चाळीस-पन्नास वर्षांपूर्वीचं हे पत्र आहे. नेहरूंनी मदत नाही केली हेच नशीब! नाही तर आज त्यांची अवस्था भारतासारखी झाली असती. भारताला मागे टाकून आज मलेशिया कुठल्या कुठे पोहोचलाय. हे सगळं सांगण्याचं तात्पर्य हेच, की या पिढीकडून तुम्ही फार अपेक्षा ठेवू शकत नाही अशीच परिस्थिती आहे.


**प्र. - मग हे सगळे निवडून कसे येतात?**

- मी तर म्हणतो हे खरं तर हे निवडून आलेले प्रतिनिधीच नाहीत. आपल्याकडे पंचेचाळीस टक्केच मतदान होतं. म्हणजे उरलेले पंचावन्न टक्के लोक मतदान करत नाहीत. याचा अर्थ त्यांचा निवडणुकीवर, उभ्या असलेल्या उमेदवारांवर विश्वास नाही आणि पंचेचाळीस टक्के मतदान करणाऱ्या लोकांमधून किती टक्के लोक या अशा प्रतिनिधींना मतं देतात? त्यात 'दारू-मटणा'ची मतं किती असतात? असा विचार करायला लागलं, की लक्षात येतं हे खरेखुरे 'लोकप्रतिनिधी' नाहीत. पैशाच्या जोरावर निवडून आलेले प्रतिनिधी आहेत. 'भारतीय लोकशाही' वगैरे आपण मोठ्या अभिमानाने म्हणतो, पण भारतीय लोकशाहीची चेष्टा यापेक्षा वेगळी काय असू शकते!

**प्र. - नव्या पिढीने जग पाहिले आहे. त्यांना मागच्या पिढीपेक्षा वेगळं एक्स्पोजर मिळालंय. तर असं वाटत नाही का, या सगळ्याचा चांगला उपयोग ही पिढी राजकारणात करू शकते?**

- दुर्दैवानं तसं नाही ना दिसत! यातले बरेचसे काय करतात? तर परदेशात जाऊन मजा करतात. तिथं जाऊन पहिल्यांदा बँका शोधतात. का तर आपल्या वडिलांनी-काकांनी-आईने जमा केलेला पैसा जमा करता येईल. 'ग्लोबल परस्पेक्टिव्ह' हा माणसाला अनुभवसंपन्न बनवतोच असे नाही.

कर्वे-आगरकर, यशवंतराव चव्हाण हे सारे शेणाने सारवलेल्या शाळेत शिकले. ज्ञानेश्वरांनी रेड्याकडून वेद वदवून घेतले, त्यांनी विश्वसंकल्पना मांडली. 'जो जे वांछिल तो ते लाहो' असं त्यांनी मागणं मागितलं. हे सारे कुठल्या 'मॅनेजमेंट स्कूल'मध्ये जाऊन नाही शिकले हो! तो राजू रामलिंगम 'इंटरनॅशनल मॅनेजमेंट स्कूल'मध्ये मॅनेजमेंटचे धडे शिकलेला माणूस, त्याने काय दिवे लावले आपल्याला माहीतच आहे.



माझं असं म्हणणं आहे, की 'माझ्यात आणि राहुल गांधीमध्ये किंबहुना माझ्यासारखे असंख्य तरुण आहेत जे कैक पटीने राहुल गांधीपेक्षा हुशार आहेत. त्यांना चांगली समज आहेत. जी राहुल गांधी यांना नाही, पण म्हणून आम्ही पंतप्रधान बनू शकतोय का? तर नाही. दुर्दैवानं यातला एकही जण आपल्या शिक्षणाचा, एक्स्पोजरचा उपयोग आपल्या प्रत्यक्ष कामात करून घेताना दिसत नाही.'

**प्र. – देशासंदर्भात प्रेम नाही, जाणिवा नाहीत असं वाटतं का?**

– आणखी एक, यातल्या कोणालाही अचानक गाठून 'जनगणमन... ' म्हणायला लावा. त्यांना ते म्हणता येणार नाही. (आता हे वाचून ते कदाचित पाठ करतील!) पत्रकार अभय मोकाशीने एकदा हा प्रयोग केला. त्याने खासदारांना गाठून 'जनगणमन' म्हणायला लावलं तर अनेकांनी तिथून पळ काढला. यांना आपलं राष्ट्रगीत नीट म्हणता येत नाही तर त्यांच्या देशप्रेम, जाणिवांबद्दल काय बोलायचं. भारताच्या राज्यघटनेआधी एक संदेश/ शपथ दिलेली आहे. जी आपण शाळेत असताना शिकलेलो आहोत. 'भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत ' असे यातल्या प्रत्येकाला म्हणायला लावा. माझी पक्की खात्री आहे, की कोणालाही म्हणता येणार नाही. ही मुलं आपल्या वडील, आई, काका, यांच्यामुळे जेवढी गांधीवादी झाली, तेवढे खुद्द गांधीजीही कधी यापूर्वी 'गांधीवादी ' नव्हते, असं म्हणावं लागतं.

'NDTV 'वर सुप्रिया सुळे यांची मुलाखत लागली होती. मुलाखत इंग्लिशमध्ये होती. मुलाखत घेणारी बाई महाराष्ट्रीयन नव्हती. तरीसुद्धा ती बाई सुप्रिया सुळेंशी बोलताना मुंबईला इंग्लिशमध्ये मुंबईच म्हणत होती, पण सुप्रिया सुळे सारखं 'बॉम्बे' म्हणत होत्या. कायद्याने बदल करून जर ' बॉम्बे'चं 'मुंबई' केलंय तर तुम्ही कायद्याचा संकेत पाळला पाहिजे ना! आणि तुम्हीच जर पाळत नसाल तर इतरांकडून काय अपेक्षा ठेवणार! याचा सगळा संबंध तुमच्यामधील जाणिवांशी असतो.

आपण राजकारण करणं म्हणजे फक्त बारामती सांभाळणं, कृषी उत्पन्न बाजारपेठा सांभाळणं, वडिलांची बँकेतील खाती सांभाळणं, वडील ज्या ज्या समित्यांवर आहेत त्या समित्यांचा कारभार बघणं, एवढ्यापुरताच मर्यादित राजकारणाचा अर्थ लावतात. राजकारण म्हणजे अंत्योदय समाजापर्यंत पोहोचणं हे त्यांना माहीत नाही. या अशा राजकारणी पुत्र-पुत्रींमुळे बरेचदा चांगले कार्यकर्ते अडगळीत जातात. मधू चव्हाण-आशिष शेलार-अतुल भातखळकर यांसारख्या कार्यकर्त्यांचं काय झालं! शिवसेनेत तर असे असंख्य कार्यकर्ते आहेत. जिथे संजय दत्तच्या ड्रायव्हरला तिकीट मिळू शकतं तिथे काहीही होऊ शकतं ना!

**प्र. – भारताला स्वातंत्र्य देण्याची चर्चा सुरू असताना चर्चिल म्हणाले होते, स्वातंत्र्य दिल्यानंतर हे लोक देशाचं वाटोळं करतील. हे वाक्य खरं ठरतंय असं वाटतंय का?**

– करतच आहेत हो वाटोळं. काय बाकी ठेवलंय. मी तर यांना 'ठग' म्हणतो. पिटरसन लिमन नावाच्या लेखकाने भारतातील 'ठग' या विषयावर एक अतिशय

माहितीपूर्ण पुस्तक लिहिलंय. पूर्वी प्रत्येक गावात सरंजामदार, जमीनदार असत. प्रवासाला निघताना ते आपल्या लव्याजम्यासह जायचे. रस्त्यात ठगांची टोळी त्यांना लुटायची. त्यांच्याकडील धन–दागदागिने लुटत. अशा ठगांचा १८५७च्या लढ्यातही सहभाग होता. ब्रिटिशांनी अशा ठगांना मध्य प्रदेशमधल्या सिंदिया घराण्यातील (ज्योतिरादित्यराजे सिंदिया हा एक नवराजकारणी पुत्र त्यांचंच प्रतिनिधित्व करतो.) राजांना हाताशी धरून ठगांना फासावर चढवलं होतं. अशा या राजसाहेबांचा पूर्वेतिहास आहे. त्यांना सलाम केल्याशिवाय ते तुमच्याकडे लक्ष देत नाहीत. तुमची दखलही घेत नाहीत. (नशीब, सुप्रिया सुळेंना कोणी राणीसाहेबा म्हणत नाही ते!) भारतीय राजकारणाची सध्याची परिस्थिती हे चर्चिलचं वाक्य खरं ठरण्याचीच परिणती आहे असं वाटतं.

**प्र. – मग या राजकीय नेत्यांच्या मुला–मुलींनी राजकारणात येऊच नये का?**

–डॉक्टर यशस्वी झाला म्हणून त्याच्या मुलाला आपण एखाद्या रुग्णाचं ऑपरेशन करायला बोलावतो का? इंजिनिअर यशस्वी झाला म्हणून त्याच्या मुलाला आपण पूल बांधायला लावतो का? गावसकरचा मुलगा तेंडुलकर का नाही बनू शकला? अमिताभचा मुलगा अभिषेक आजही का पडतो?

योग्यता आणि क्षमता या घराण्याशी संबंध ठेवणाऱ्या गोष्टी नाहीत. किंबहुना हे जीवघेणं आहे. डॉक्टरच्या बाबत पाहिलेल्या उदाहरणात जर तसं घडलं तर पेशंटचा जीव जाईल. इथे तर राष्ट्राचा जीव या पिढीच्या हातात आहे. मी असे अनेक नेते ओळखतो, जे वर उल्लेख केलेल्या राजकारणी स्टार पुत्र–पुत्री–पुतण्यांपेक्षा असंख्य वादातीत गुण त्यांच्यामध्ये आहेत. परंतु या संघराज्याला अभूतपूर्व ढवळून काढणारी क्रांती घडल्याशिवाय त्यांना संधी मिळेल असं काही वाटत नाही.

**प्र. – पण मग त्यांनाच राजकारणात संधी का मिळते? दिली जाते?**

– त्यांच्या अभूतपूर्व समृद्धी आणि सुबत्तेमुळे (जी फक्त त्यांच्यापुरतीत आहे.) उरलेला ८५ टक्के देश ज्वालामुखीसारखा खदखदत आहे. आज जम्मू–काश्मीर किंवा ईशान्येकडील राज्यांमध्ये जे पाहात आहोत तेच चित्र देशभर दिसणार नाही, याची ग्वाही मी देऊ शकत नाही, पण निदान मी एवढी ग्वाही देऊ शकतो, की राजकीय स्टार पुत्र–पुत्री मंडळी राज्य करणं तर दूरच, आपल्या काकांचं–वडिलांचं परदेशातील खातं टिकवू शकले तरी खूप झालं. यांच्या हितासाठी यांचे बाप–काका–आई हे राज्यकर्ते आहेत. ते अंबानी ते हिरानंदानी–गोएंका–ठक्कर–शहा–ओबेरॉय या बिल्डर आणि उद्योजकांना कायदाबाह्य सवलती देऊन तुमच्या–आमच्यासारख्या सामान्यांना ओरबाडत सुटले आहेत. सामान्य शेतकरी तालुका पातळीवरील ऑफिसमध्ये पोहोचू शकत नाही. ३८० कलम लागलेला एक बिल्डर मुख्यमंत्र्यांच्या स्वयंपाकघरापर्यंत पोहोचतो. हिरानंदानीला साऱ्या सवलती आणि विदर्भातील शेतकऱ्यांना 'बेगॉन!'

तुम्हाला काय वाटतं, ही सारी मुलं सुखाने जगू शकतील? लोक त्यांना तसं जगू देणार नाहीत.

या मुलांसाठी काम करणाऱ्या 'इमेज मेकिंग' कंपन्यांची चांदी झालेली आहे. म्हणूनच राहुल गांधी कलावतीच्या झोपडीत जाऊन चहा पिऊ शकतो. धन्य ती 'इमेज मेकिंग कंपनी'. रेड इंडियन्सनी अमेरिकन्ससाठी म्हटलेली एक म्हण आहे जी या सगळ्यांना लागू पडते. ती मला इथे सांगावीशी वाटते–

''जोपर्यंत शेवटची नदी सुकत नाही,
जोपर्यंत शेवटचं झाड मरत नाही,
जोपर्यंत शेवटचा मासा जीव टाकत नाही,
तोपर्यंत यांना कळणार नाही की,
माणूस पैसा खाऊन जिवंत राहू शकत नाही''

■■